# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 26/02/2024 (सोमवार) सकाळ


---

### पो.स्टे. सावनेर हद्दीमधील पहलेपार येथे जुगार अड्डयावर धाड
### —: नागपूर ग्रामीण पोलीसांची कारवाई :—

पोलीस स्टेशन सावनेर येथील स्टाफ पोलीस स्टेशन सावनेर हद्दीत दिनांक २५/०२/२०२४ रोजी पेट्रोलिंग करीत असता पहलेपार येथे जिवन बसोटीया याचे घरात काही ईसम हे पैशाची बाजी लावुन हारजीतचा जगार खेळ खेळत आहे. अशी गुप्त बातमीदाराकडुन बातमी मिळाल्यावरून मा. श्री. अनिल मस्के साहेब भापोसे सहाय्यक पोलीस अधिक्षक सावनेर विभाग सावनेर यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक रविंद्र मानकर सोबत स्टाफ पोहवा. अनिल मुंडे, महेश डंभारे, सुनिल तलमले, अतुल खोडणकर होमगार्ड सह रेड केली असता **आरोपी नामे— १) सुंदरलाल हुकुमचंद कोंढोले वय ५० वर्ष २) जगदीश भैय्यालाल बसोटीया, वय ५२ वर्ष ३) किशोर धुलीचंद ठाकुर वय ३४ वर्ष ४) जयंत लक्ष्मीनारायण आमगावकर वय ३२ वर्ष ५) अक्षय उर्फ विरेंद्र नामदेव बहेटवार वय २९ वर्ष ६) संदीप गंगाराम तुरे वय ४१ वर्ष सर्व राहणार पहलेपार सावनेर** हे ताश पत्त्यावर जुगार खेळ खेळतांना मिळुन आले. त्यांचे जवळुन नगदी १६५६०/— रु व मोबाईल १६५००/— रु असा एकुण ३३०६०/— रु. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला असुन आरोपी १) जिवन भैय्यालाल बासोटीया २) सुरेश वर्मा दोन्ही रा. पहलेपार फरार झाले आहे. आरोपी विरुध्द पो. स्टे. सावनेरला अप क्रमांक २०९/२४ कलम ४, ५ जुगार कायदा प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कारवाई ही मा. पोलीस अधीक्षक श्री. हर्ष पोद्दार नागपुर ग्रामीण, अपर पोलीस अधीक्षक श्री. रमेश धुमाळ, श्री. अनिल मस्के सहाय्यक पोलीस अधिक्षक सावनेर विभाग सावनेर यांचे मार्गदर्शनाखाली सावनेर येथील ठाणेदार पोनि रविंद्र मानकर, पोहवा सुनिल तलमले, अतुल खोडनकर, अनिल मुंडे, चापोहवा महेश डंबारे, प्रितम पवार, होमगार्ड दिलीप चरपे यांनी पार पाडली.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर